Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

मंगळवार, दि. २८ एप्रिल २०२६ । वर्ष १ । अंक २३ । पाने २। DIGITAL EDITION



(पान २ वर)

## नवबौद्धांपाठोपाठ या जातींनी उपवर्गीकरणाच्या विरोधात थोपटले दंड

# एससी आरक्षण उपवर्गीकरणावरून महाराष्ट्रात मतभेद!

## नवबौद्ध, चर्मकार-लोहार विरोधात; मातंग समाजाची तातडीने अंमलबजावणीची मागणी

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी**
**राज्यातील अनुसूचित जाती (SC) प्रवर्गातील १३ टक्के आरक्षणाचे 'अ, ब, क, ड' असे उपवर्गीकरण करण्याच्या प्रस्तावावरून सामाजिक आणि राजकीय स्तरावर तीव्र मतभेद समोर येऊ लागले आहेत. विशेषतः नवबौद्ध, चर्मकार आणि होलार समाजाने या उपवर्गीकरणाला सुरुवातीपासूनच ठाम विरोध दर्शवला असून, दुसरीकडे मातंग समाजाने मात्र तातडीने अंमलबजावणीची मागणी करत वेगळी भूमिका घेतली आहे. परिणामी, अनुसूचित जातींमधील अंतर्गत मतभेद सरकारसमोर मोठे आव्हान निर्माण करत आहेत.**



**सरकारचा उपवर्गीकरणाचा प्रयत्न**

कर्नाटक, हरियाणा, आंध्र प्रदेश, पंजाब आणि तामिळनाडू या राज्यांच्या धर्तीवर महाराष्ट्रातही अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करण्याचा महायुती सरकारचा विचार आहे. या पार्श्वभूमीवर स्थापन करण्यात आलेल्या न्या. बदर समितीचा अहवाल शासनाला सादर झाला असून, त्यावर ३० एप्रिलपर्यंत हरकती व सूचना मागवण्यात आल्या आहेत. सरकारच्या या हालचालीमुळे राज्यात सामाजिक समीकरणे ढवळून निघण्याची चिन्हे आहेत.

**लोकसंख्या आणि आरक्षणाचा ताळमेळ**

राज्यात अनुसूचित जातींची लोकसंख्या सुमारे ११.४५ टक्के असून या प्रवर्गाला १३ टक्के आरक्षण देण्यात आले आहे. या आरक्षणामध्ये एकूण ५९ जातींचा समावेश आहे. मात्र या सर्व घटकांमध्ये लाभाचे समान वितरण होत नसल्याची भावना काही समाजांमध्ये असून, त्यातूनच उपवर्गीकरणाची मागणी पुढे आली आहे.

**नवबौद्धांचा ठाम विरोध**

अनुसूचित जातींमध्ये सर्वाधिक म्हणजे सुमारे ६२ टक्के वाटा असलेल्या नवबौद्ध समाजाने उपवर्गीकरणाला तीव्र विरोध दर्शवला आहे. न्या. बदर समितीचा अहवाल सार्वजनिक करावा आणि अद्ययावत जनगणनेची आकडेवारी उपलब्ध होईपर्यंत कोणताही निर्णय घेऊ नये, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे. उपवर्गीकरणामुळे सामाजिक व राजकीय प्रतिनिधित्वावर परिणाम होईल, अशी भीती या समाजाकडून व्यक्त केली जात आहे.

**चर्मकार आणि होलार समाजही विरोधात**

नवबौद्धांच्या भूमिकेला पाठिंबा देत चर्मकार आणि होलार समाजानेही उपवर्गीकरणास विरोध दर्शवला आहे. अनुसूचित जातींमध्ये सुमारे १० टक्के वाटा असलेल्या चर्मकार समाजाचे नेते आणि माजी मंत्री बबनराव घोलप यांनी स्पष्टपणे सांगितले की, "आरक्षणात वाटे घालणे मान्य नाही. उपवर्गीकरण झाल्यास आमचे दबावगट म्हणून असलेले अस्तित्व आणि राजकीय प्रतिनिधित्व धोक्यात येईल."

तसेच, सुमारे ०.८ टक्के लोकसंख्या असलेल्या होलार समाजाने पंढरपूर येथे झालेल्या परिषदेत उपवर्गीकरणाला विरोध जाहीर केला आहे.

**मातंग समाजाची वेगळी भूमिका**

दुसरीकडे, अनुसूचित जातींमध्ये सुमारे १९ टक्के वाटा असलेल्या मातंग समाजाने उपवर्गीकरणाला पाठिंबा देत त्याची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे. आमदार अमीत गोरखे यांनी उपवर्गीकरण लागू होईपर्यंत नोकरभरती स्थगित ठेवावी, तसेच मागास प्रवर्गातील अनुशेष दूर करण्यासाठी २ टक्के वाढीव आरक्षण द्यावे, अशी मागणी केली आहे.

**सरकारसमोर मोठे आव्हान**

अनुसूचित जातींमधील या तीन प्रमुख समाजांच्या परस्परविरोधी भूमिकेमुळे राज्य सरकारसाठी हा विषय अधिक गुंतागुंतीचा ठरत आहे. एका बाजूला समतोल लाभ वितरणाचा मुद्दा आहे, तर दुसऱ्या बाजूला सामाजिक ऐक्य आणि राजकीय प्रतिनिधित्वाचा प्रश्न आहे. त्यामुळे सरकार कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.
नएकूणच, उपवर्गीकरणाचा हा वाद केवळ धोरणात्मक न राहता सामाजिक आणि राजकीय पातळीवरही मोठा परिणाम घडवू शकतो. आगामी काळात यावर होणारे निर्णय राज्यातील आरक्षणाच्या राजकारणाला नवी दिशा देणार, हे निश्चित आहे.

Selected

### 1 मे पासून गॅस सिलेंडर बुकिंग, नियमात बदल !

**नवी दिल्ली :** येत्या १ मे २०२६ पासून घरगुती एलपीजी गॅस सिलेंडरच्या बुकिंग आणि वितरण नियमांमध्ये मोठे बदल होण्याची शक्यता आहे. ऑईल मार्केटिंग कंपन्या दर महिन्याच्या पहिल्या तारखेला गॅसच्या किमतींचा आढावा घेतात, त्यामुळे मे महिन्याच्या सुरुवातीला सिलेंडरच्या दरात मोठी सुधारणा किंवा कपात केली जाऊ शकते. किमतीत बदल: आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील कच्च्या तेलाच्या किमती आणि रुपयाचे मूल्य लक्षात घेता, घरगुती आणि व्यावसायिक गॅस सिलेंडरचे दर बदलू शकतात. * बुकिंग प्रक्रिया: सिलेंडर बुकिंगसाठी वापरल्या जाणाऱ्या ॲप्स किंवा 'आयव्हीआरएस' प्रणालीमध्ये काही तांत्रिक बदल केले जाण्याची शक्यता आहे, ज्यामुळे बुकिंग प्रक्रिया अधिक वेगवान होईल. वितरण सुरक्षा: सिलेंडर घरपोच देताना सुरक्षिततेच्या दृष्टीने 'डिलिव्हरी ऑथेंटिकेशन कोड' (डीएसी) किंवा ओटीपी पडताळणी अधिक कडक केली जाऊ शकते. ग्राहकांनी त्यांचा मोबाईल क्रमांक अद्ययावत ठेवणे आता अनिवार्य असेल.

# जळगाव पोलीस मुख्यालयातील स्टोअर रूमला भीषण आग

## महत्त्वाची कागदपत्रे व साहित्य जळून खाक; शॉर्ट सर्किटचा प्राथमिक अंदाज

जन सम्राट टाईम्स

**जळगाव |** शहरातील पोलीस मुख्यालयात सोमवारी अचानक भीषण आग लागल्याची धक्कादायक घटना घडली. मुख्यालयाच्या आवारातील स्टोअर रूमला लागलेल्या या आगीत मोठ्या प्रमाणात कागदपत्रे, स्टेशनरी तसेच पोलीस बंदोबस्तासाठी लागणारे विविध साहित्य जळून खाक झाले. घटनेमुळे पोलीस प्रशासनात खळबळ उडाली असून नुकसानीचा नेमका आकडा अद्याप स्पष्ट झालेला नाही.



**क्षणात पेटली आग, धुराचे लोट**

मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस मुख्यालयातील स्टोअर रूममधून अचानक धूर निघताना दिसून आला. काही क्षणांतच आगीने भीषण रूप धारण केले आणि संपूर्ण खोलीला वेढा घातला. या खोलीत विविध महत्त्वाची कागदपत्रे, स्टेशनरी साहित्य आणि पोलिसांच्या कामकाजासाठी लागणाऱ्या वस्तू साठवून ठेवण्यात आल्या होत्या. त्यामुळे आगीमुळे मोठे नुकसान झाले आहे.

**अग्निशमन दलाची तत्परता; मोठा अनर्थ टळला**

घटनेची माहिती मिळताच जळगाव महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाचे बंब तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाने शर्थीचे प्रयत्न करत आगीवर नियंत्रण मिळवले. वेळेत आग आटोक्यात आल्यामुळे इमारतीतील इतर भाग सुरक्षित राहिले आणि मोठा अनर्थ टळला.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

# शेतकऱ्यांच्या आड येणाऱ्यांची गय नाही!

## अमित शाहांनी अहमदाबादमध्ये बजावला हक्क



जन सम्राट टाईम्स

**जळगाव** | प्रतिनिधी | जळगाव व धरणगाव तालुक्यांच्या खरीप हंगाम २०२६ पूर्वनियोजन बैठकीत गुलाबराव पाटील यांनी शेतकरी हिताला बाधा आणणाऱ्यांविरोधात कडक भूमिका घेतली. "शेतकऱ्यांच्या आड येणाऱ्यांची गय करू नका. बोगस बियाणे, खते आणि कीटकनाशकांची विक्री करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करा," असा सज्जड इशारा त्यांनी प्रशासनाला दिला. जिल्हा परिषद जळगाव येथील श्री छत्रपती शाहू महाराज सभागृहात पार पडलेल्या या संयुक्त बैठकीत खरीप हंगामाच्या तयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी बदलत्या हवामानाचा विचार करून शेतकऱ्यांनी योग्य नियोजन करण्याचे आवाहनही करण्यात आले.

**खतांचा तुटवडा होणार नाही**

पालकमंत्री पाटील यांनी स्पष्ट केले की, खरीप हंगामासाठी खतांचा पुरेसा साठा उपलब्ध असून कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांना कमतरता भासू दिली जाणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी घाबरून न जाता नियोजनबद्ध पद्धतीने शेतीची तयारी करावी, असे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी काही महत्त्वाच्या सूचना दिल्या. वाढत्या तापमानामुळे मशागतीची कामे सकाळच्या वेळेत करावीत, धूळपेर टाळून बीजप्रक्रिया करूनच पेरणी करावी, तसेच एकाच पिकावर अवलंबून न राहता आंतरपीक व मिश्रपीक पद्धतीचा अवलंब करावा, असे त्यांनी सुचवले. अनधिकृत कंपन्यांच्या भूलथापांना बळी पडू नये, केवळ अधिकृत विक्रेत्यांकडूनच बियाणे व खते खरेदी करून पक्के बिल घ्यावे आणि ते जतन करावे, असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

**शेतकरी गट व प्रक्रिया उद्योगांवर भर**

गावपातळीवर तरुण आणि महिलांनी एकत्र येऊन शेतकरी गट स्थापन करावेत आणि कृषीपूरक उद्योग सुरू करावेत, असे आवाहनही त्यांनी केले. कृषी अधिकाऱ्यांनी नियमित शेतभेटी देऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे, अशा सूचनाही देण्यात आल्या.

**अनुदान वाटप व शेतकरी सन्मान**

बैठकीदरम्यान 'गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना' अंतर्गत ३४ शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आले. प्रतिनिधिक स्वरूपात पंकज सोनवणे, अनिता पाटील आणि विनायक कोळी यांना धनादेश प्रदान करण्यात आले.तसेच, गावपातळीवर प्रक्रिया उद्योग सुरू करून रोजगार निर्मिती करणाऱ्या आदर्श शेतकरी योगेश झांबरे यांचा सन्मान करण्यात आला. यासोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीत प्रगती साधणाऱ्या गोकुळ लंके (पथराड) आणि सुरेश पाटील (वावडदा) यांचाही गौरव करण्यात आला.

# बँकिंग क्षेत्रात मोठे बदल: रिझर्व्ह बँकेकडून 'ईसीएल' फ्रेमवर्क जाहीर

## १ एप्रिल २०२७ पासून नवे नियम लागू होणार

जन सम्राट टाईम्स

**मुंबई|** भारतीय बँकिंग व्यवस्था अधिक सुरक्षित आणि पारदर्शक बनवण्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने (आरबीआय) एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. बँकांसाठी 'एक्सपेक्टेड क्रेडिट लॉस' (ईसीएल) ही नवीन नियमावली जाहीर करण्यात आली असून, तिची अंमलबजावणी १ एप्रिल २०२७ पासून केली जाणार आहे. या निर्णयामुळे बँकांच्या अनुत्पादित कर्जाच्या (एनपीए) तरतुदीच्या पद्धतीत आमूलाग्र बदल होणार आहे.

**काय आहे 'ईसीएल' फ्रेमवर्क?**

सध्या भारतीय बँका 'इन्कर्ड लॉस' मॉडेलचा वापर करतात. याचा अर्थ असा की, जेव्हा एखादे कर्ज प्रत्यक्षात बुडते किंवा हप्ता थकतो, तेव्हाच बँक त्या कर्जासाठी तरतूद (प्रोव्हीजनिंग) करते. मात्र, नवीन 'ईसीएल' मॉडेलनुसार, बँकांना आता कर्ज बुडण्याची वाट पाहावी लागणार नाही. कर्जाच्या सुरुवातीपासूनच, भविष्यातील आर्थिक परिस्थिती आणि ग्राहकाची पत पाहून संभाव्य जोखमीचा अंदाज घ्यावा लागेल आणि त्या प्रमाणात आधीच पैसे बाजूला काढून ठेवावे लागतील.

**नव्या नियमावलीची मुख्य वैशिष्ट्ये**

१. तीन टप्प्यांत वर्गीकरण: बँकांना त्यांच्या कर्जांचे वर्गीकरण स्टेज १, स्टेज २ आणि स्टेज ३ अशा तीन भागांत करावे लागेल. कर्जाचा धोका किती आहे, यानुसार ही विभागणी असेल.

२. प्रगत तरतूद (फॉरवर्ड लूकिंग प्रोव्हिजनिंग): केवळ भूतकाळातील नोंदी न पाहता, भविष्यातील आर्थिक चढ-उतार लक्षात घेऊन तरतूद करावी लागेल.

३. एनपीए निकषात कडकपणा: यामुळे बँकांना आपल्या ताळेबंदातील जोखीम अधिक गांभीर्याने हाताळावी लागेल, ज्यामुळे बँकिंग व्यवस्था अधिक लवचिक होईल.

**अंमलबजावणीसाठी वेळ का दिला?**

आरबीआय ने या नियमावलीसाठी एप्रिल २०२७ ही मुदत दिली आहे. बँकांना त्यांच्या सध्याच्या आयटी सिस्टिममध्ये बदल करण्यासाठी, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करण्यासाठी आणि आवश्यक अतिरिक्त भांडवलाची (कॅपिटल बफर) व्यवस्था करण्यासाठी हा वेळ देण्यात आला आहे. तातडीने अंमोलबजावणी केल्यास बँकांच्या नफ्यावर मोठा परिणाम होऊ शकला असता, त्यामुळे संक्रमण काळ (ट्रान्झिशन पिरियड) देण्यात आला आहे.




# टिटवाळ्यात मराठी भाषेला नकार; झेनो मेडिकलला ७ दिवसांचा अल्टिमेटम!

## मनसे आक्रमक; मराठीत संवाद अनिवार्य करण्याची मागणी, कायदेशीर कारवाईचा इशारा

जन सम्राट टाईम्स

**टिटवाळा :** टिटवाळा परिसरात झोने मेडिकल या औषध विक्री केंद्राविरोधात मराठी भाषेच्या अवमानाची गंभीर घटना समोर आली आहे. एका स्थानिक क्रमांकावरून करण्यात आलेल्या फोन कॉलदरम्यान संबंधित कर्मचाऱ्याने मराठी भाषेत संवाद साधण्यास स्पष्ट नकार दिल्याची बाब उघड झाल्याने परिसरात संताप व्यक्त केला जात आहे.

महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या आस्थापनांनी स्थानिक अधिकृत भाषा असलेल्या मराठीचा वापर करणे अपेक्षित असताना अशा प्रकारची घटना घडल्याने भाषिक अस्मितेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) आक्रमक



झाली असून संबंधित व्यवस्थापनाला ७ दिवसांचा अल्टिमेटम देण्यात आला आहे.

**कायद्याचा आधार घेत मनसेचा इशारा**

राज्यात लागू असलेल्या 'महाराष्ट्र अधिकृत भाषा अधिनियम, १९६४'नुसार शासकीय, निमशासकीय तसेच नागरिकांना सेवा देणाऱ्या खाजगी संस्थांनी व्यवहारात मराठी भाषेचा वापर करणे बंधनकारक आहे. या कायद्याचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई होऊ शकते. मनसेकडून देण्यात आलेल्या नोटीसमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे की, संबंधित मेडिकलने आपल्या सर्व कर्मचाऱ्यांना मराठी भाषेत संवाद साधण्याचे सक्त निर्देश द्यावेत. अन्यथा पोलीस तक्रार दाखल करून पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. मनसे पदाधिकाऱ्यांची उपस्थिती या वेळी मनसेच्या वतीने दिलीप पुनमचंद राठोड (विशेष कार्यकारी अधिकारी), ॲड. अविनाश पांडुरंग शिळकंदे (उपाध्यक्ष – महाराष्ट्र नवनिर्माण महापालिका कर्मचारी सेना), ॲड. महेश गायकवाड (नोटरी व वकील) आणि रोहित जोशी (महाराष्ट्र सैनिक) उपस्थित होते. त्यांनी या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत मराठी भाषेचा सन्मान राखण्याची मागणी केली. परिसरात संतापाची लाट या घटनेनंतर टिटवाळा परिसरात नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, स्थानिक भाषेचा आदर राखणे ही प्रत्येक संस्थेची जबाबदारी असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. मराठी भाषेला दुय्यम वागणूक दिली जाणार नाही, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे. एकूणच, या प्रकरणामुळे राज्यात पुन्हा एकदा मराठी भाषेच्या वापराबाबत चर्चा रंगली असून, संबंधित आस्थापना काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

» Selected

## बिर्याणीनंतर कलिंगड खाणे जिवावर बेतले; चौघांचा दुर्दैवी मृत्यू

**मुंबई** : दक्षिण मुंबईतील गजबजलेल्या पायधुनी परिसरात अन्नातून विषबाधा झाल्याची एक अत्यंत धक्कादायक आणि मन हेलावणारी घटना समोर आली आहे. एका मेजवानीचा आनंद लुटणाऱ्या कुटुंबावर काळाने घाला घातला असून, या घटनेत आई-वडील आणि त्यांच्या दोन तरुण मुली अशा एकूण चौघांचा मृत्यू झाला आहे. बिर्याणी आणि त्यानंतर खाल्लेले कलिंगड या कुटुंबासाठी जीवघेणे ठरले असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पायधुनी येथील या कुटुंबाने रात्रीच्या जेवणात बिर्याणीचा आस्वाद घेतला होता. जेवण झाल्यानंतर काही वेळाने कुटुंबातील सर्व सदस्यांनी कलिंगड खाल्ले. मात्र, त्यानंतर काही तासांतच सर्वांना उलट्या आणि मळमळीचा त्रास सुरू झाला. प्रकृती खालावल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान चारही सदस्यांचा मृत्यू झाला.मुंबई पोलिसांच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणाचा तपास सुरू आहे. मृत्यू होण्यापूर्वी कुटुंबातील एका व्यक्तीने पोलिसांना दिलेल्या जबानीत सांगितले की, त्यांनी रात्री एकत्र बसून बिर्याणी खाल्ली होती आणि त्यानंतर लगेचच कलिंगड खाल्ले होते. या विधानानंतर पोलिसांनी अन्नाचे नमुने गोळा केले असून ते प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. एका हसत्या-खेळत्या कुटुंबाचा अशा प्रकारे अंत झाल्याने परिसरात शोककळा पसरली आहे. वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, काही वेळा विशिष्ट खाद्यपदार्थांचे मिश्रण किंवा अन्नामध्ये झालेल्या संसर्गामुळे (कॉँटामिनेशन) शरीरात तीव्र विषबाधा होऊ शकते. या प्रकरणात बिर्याणीमध्ये काही बिघाड होता की, कलिंगडामुळे संसर्ग झाला, याचा शोध पोस्ट-मॉर्टम अहवाल आणि फॉरेन्सिक रिपोर्टनंतरच लागेल.

# तरुणांनी देशाच्या जडणघडणीत सक्रिय भूमिका घ्यावी!

## राहुल गांधी : दिल्ली विद्यापीठातील विद्यार्थ्यांशी संवाद; 'जेन झेड' महिलांच्या नेतृत्वावर विश्वास

जन सम्राट टाईम्स



**नवी दिल्ली | विक्रांत पाटील**

राहुल गांधी यांनी सोमवारी दिल्ली विद्यापीठातील विद्यार्थ्यांशी संवाद साधत देशाच्या भविष्याविषयी महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर भाष्य केले. युवकांनी केवळ करिअरपुरते मर्यादित न राहता देशाच्या जडणघडणीत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. संवादादरम्यान त्यांनी राजकारणातील सहभाग, युवकांचे प्रतिनिधित्व आणि सामाजिक जबाबदारी यावर सखोल विचार मांडले.

राहुल गांधी म्हणाले की, भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात तरुण पिढी ही परिवर्तनाची सर्वात मोठी शक्ती आहे. "देशाचा विकास केवळ धोरणांवर नाही, तर त्या धोरणांची अंमलबजावणी करणाऱ्या सजग नागरिकांवर अवलंबून असतो. त्यामुळे तरुणांनी राजकीय, सामाजिक आणि आर्थिक प्रक्रियांमध्ये सहभाग नोंदवणे आवश्यक आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

**'जेन झेड' महिलांच्या नेतृत्वावर भर**

आपल्या भाषणात त्यांनी 'जेन झेड' पिढीतील महिलांच्या भूमिकेवर विशेष भर दिला. त्यांच्या मते, भारताच्या भविष्यातील नेतृत्वात महिलांचा वाटा निर्णायक ठरणार आहे. "या पिढीतील महिला अधिक आत्मविश्वासपूर्ण, जागरूक आणि निर्णयक्षम आहेत. त्यांचे नेतृत्व अधिक सर्वसमावेशक आणि संवेदनशील असेल," असे ते म्हणाले. महिलांना राजकारणात आणि नेतृत्वाच्या भूमिकेत अधिक संधी मिळणे गरजेचे असल्याचे सांगत त्यांनी शिक्षण, समान संधी आणि सुरक्षित वातावरण यांचे महत्त्व अधोरेखित केले. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी महिलांचे योगदान अपरिहार्य असल्याचे त्यांनी नमूद केले.

**डिलिमिटेशनवर व्यक्त केली चिंता**

यावेळी राहुल गांधी यांनी आगामी मतदारसंघ पुनर्रचनेच्या (Delimitation) प्रक्रियेवरही भाष्य केले. त्यांनी यासंदर्भात संभाव्य परिणामांविषयी चिंता व्यक्त करत सांगितले की, लोकसंख्येच्या आधारावर मतदारसंघांची फेररचना केल्यास दक्षिण आणि उत्तर भारतातील राज्यांमधील प्रतिनिधित्वाचा समतोल बिघडू शकतो. "ही प्रक्रिया योग्य पद्धतीने न राबविल्यास प्रादेशिक असमतोल वाढू शकतो आणि त्यामुळे देशाच्या एकात्मतेवर परिणाम होण्याची शक्यता आहे," असा इशारा त्यांनी दिला. देशाची एकता आणि विविधतेतील समतोल राखण्यासाठी या विषयावर व्यापक चर्चा आणि विचारविनिमय आवश्यक असल्याचे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

**युवकांसाठी संदेश**

संवादाच्या शेवटी त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले की, त्यांनी प्रश्न विचारण्याची आणि बदल घडवण्याची वृत्ती कायम ठेवावी. "लोकशाही अधिक मजबूत करण्यासाठी तरुणांनी सक्रिय राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तुमचा आवाज आणि तुमची भूमिका देशाच्या भविष्यासाठी निर्णायक ठरू शकते," असे ते म्हणाले. या संवादातून युवकांना केवळ राजकीय जाणिवाच नव्हे, तर सामाजिक जबाबदारीची जाणीवही झाली. राहुल गांधी यांच्या या भेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, देशाच्या विकास प्रक्रियेत योगदान देण्याची प्रेरणा मिळाल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

### महिला आरक्षणाबाबतचा प्रश्न आणि राहुल गांधींचं उत्तर

राहुल गांधींशी दिल्ली विद्यापीठाच्या विद्यार्थिनींनी जेव्हा चर्चा केली तेव्हा साहजिकच त्यांनी प्रश्न विचारला तो महिला आरक्षणाच्या विधेयकाचा. विरोधक हे महिला आरक्षण विरोधी आहेत का? तसंच महिलांकडे एक वस्तू म्हणून पाहिलं जातं याबाबत तुम्हाला काय वाटतं? असा प्रश्न विचारला असता राहुल गांधी म्हणाले, हे खरं आहे पण आमचा पक्ष हे कमी प्रमाणात करतो. माझ्यासाठी महिला म्हणजे शिव आणि शक्तीचं स्वरुप आहे. महिला असो की पुरुष या दोघांचाची समानता महत्त्वाची आहे यावर माझा विश्वास आहे. तसंच मला हे वाटतं की महिलांची शक्ती ही पुरुषांपेक्षा अधिक परिणामकारक आहे. महिलांमध्ये पुरुषांच्या तुलनेत काम करण्याची क्षमताही अधिक आहे हे माझं मत आहे, असं राहुल गांधी म्हणाले. तसंच महिला आरक्षण विधेयकावरच्या प्रश्नावर उत्तर देत राहुल गांधी म्हणाले, महिला सशक्तीकरणाचं सर्वात जास्त काम कुणी केलं असेल तर ते पंचायत राजने केलं आहे हे नाकारता येणार नाही.

# नशिराबाद प्रवेशद्वाराला 'झिपरू अण्णा महाराज' नाव देण्याची मागणी

## तरुणांकडून नगरपरिषदेला निवेदन; ग्रामदैवताचा सन्मान राखण्याची आग्रही विनंती

**नशिराबाद** | जळगाव-भुसावळ जुन्या महामार्गावर नशिराबाद गावाच्या प्रवेशासाठी उभारण्यात आलेल्या भव्य प्रवेशद्वाराला प.पू. श्री झिपरू अण्णा महाराज यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थ आणि तरुणांकडून जोर धरू लागली आहे. गावाची धार्मिक ओळख अधिक दृढ करण्यासाठी आणि ग्रामदैवताचा यथोचित सन्मान व्हावा, या उद्देशाने ही मागणी करण्यात आली आहे.

या संदर्भात 'तरुण दुर्गा उत्सव मित्र मंडळ' (अयोध्या चौक, धोबीवाडा) यांच्या वतीने सोमवार, दि. २७ एप्रिल २०२६ रोजी नशिराबाद नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रवींद्र





सोनवणे यांना सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात प्रवेशद्वाराच्या नामकरणाबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याची विनंती करण्यात आली आहे.

**ग्रामदैवताच्या नावाने ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न**

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, प.पू. श्री झिपरू अण्णा महाराज हे नशिराबादचे आराध्य दैवत असून केवळ गावापुरते मर्यादित न राहता लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहेत. त्यांच्या नावाने प्रवेशद्वाराचे नामकरण झाल्यास नशिराबादला एक वेगळी आध्यात्मिक ओळख मिळेल. तसेच गावाची सांस्कृतिक परंपरा आणि अस्मिता जपण्यासही मदत होईल.

**पुण्यतिथीचे औचित्य साधण्याची मागणी**

येत्या ११ मे रोजी झिपरू अण्णा महाराज यांची पुण्यतिथी आहे. या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेकडून नामकरणाचा निर्णय घेतल्यास तो ग्रामस्थांसाठी अभिमानाचा क्षण ठरेल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. आगामी नगरपरिषद सभेत हा विषय प्राधान्याने मांडून मंजुरी द्यावी, अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे.

**नागरिकांचा मोठा पाठिंबा**

या निवेदनावेळी राहुल कोळी, विवेक धोबी, भूषण कोल्हे, आकाश धोबी, गणेश मराठे, पंकज साळी, चंदन राणे यांच्यासह गावातील अनेक नागरिक उपस्थित होते. तसेच या मागणीला पाठिंबा देत मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

**नगरपरिषदेच्या निर्णयाकडे लक्ष**

दरम्यान, या मागणीवर नगरपरिषद काय निर्णय घेते याकडे संपूर्ण नशिराबादकरांचे लक्ष लागले आहे. ग्रामदैवताच्या नावाने प्रवेशद्वाराचे नामकरण झाल्यास गावाच्या ओळखीत भर पडेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

जन सम्राट टाईम्स विशेष बातमी

# युवक हीच देशाची खरी संपत्ती!

## जळगावात 'सतपंथ शिष्यवृत्ती महाअभियाना'चा दिमाखात शुभारंभ





। जन सम्राट टाईम्स ।

- ५० हून अधिक गरजू विद्यार्थ्यांना मोफत उच्च शिक्षणाची संधी; खानदेशभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद
- UPSC-MPSC-JEE-NEET साठी मोफत प्रशिक्षण | ३००+ विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा | समाजोपयोगी उपक्रमाला मान्यवरांचा पाठिंबा

**पाळधी / जळगाव** | "बुद्धिमान आणि संस्कारशील युवक हीच राष्ट्राची खरी संपत्ती आहे. शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्रसेवा करणारा सक्षम युवक घडवणे हेच आपले कर्तव्य आहे," असे प्रतिपादन जनार्दन महाराज यांनी केले. सतपंथ चॅरिटेबल ट्रस्ट, फैजपूर आणि नोबेल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सतपंथ शिष्यवृत्ती महाअभियाना'च्या प्रवेश परीक्षेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

खानदेशातील जळगाव, धुळे आणि नंदुरबार या तीन जिल्ह्यांत हा उपक्रम मोठ्या उत्साहात राबविण्यात आला. समाजातील गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याचा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. गरजू विद्यार्थ्यांसाठी मोठी संधी या महाअभियानांतर्गत ५० हून अधिक विद्यार्थ्यांची निवड केली जाणार असून, त्यांना UPSC, MPSC, JEE आणि NEET यांसारख्या स्पर्धा परीक्षांसाठी उच्च दर्जाचे प्रशिक्षण पूर्णपणे मोफत दिले जाणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यांसाठी निवास व भोजनाची सुविधाही उपलब्ध करून दिली जाणार आहे. ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम मोठा आधार ठरणार आहे.

**मान्यवरांची उपस्थिती**

या सोहळ्याला राजूमामा भोळे, उपमहापौर मनोज चौधरी, शिक्षणाधिकारी निलेश पाटील, नगरसेवक नरेंद्र पाटील, तसेच ग्लोबल मिशन स्कूलचे चेअरमन मनोहर पाटील आणि नोबेल फाउंडेशनचे संचालक जयदीप पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. आमदार राजूमामा भोळे यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, "सतपंथ शिष्यवृत्ती प्रकल्प हा जळगाव जिल्ह्यासाठी दिशादर्शक ठरेल. अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील गुणवत्तेला योग्य व्यासपीठ मिळेल." शिक्षणाधिकारी निलेश पाटील यांनीही एका आध्यात्मिक संस्थेने शिक्षण क्षेत्रात पुढाकार घेणे ही अभिमानास्पद बाब असल्याचे नमूद केले.

प्रवेश परीक्षेला उत्स्फूर्त प्रतिसाद या महाअभियानाच्या प्रवेश परीक्षेस खानदेशभरातून ३०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते प्रश्नपत्रिकांचे विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन जयदीप पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन रमेश पाटील यांनी मानले. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजेंद्र पाटील, अक्षय देवरे, विवेक साळुंखे, तुषार पाटील, प्रशांत तायडे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

एकूणच, 'सतपंथ शिष्यवृत्ती महाअभियान' हा सामाजिक बांधिलकी जपणारा आणि विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मार्गदर्शक ठरणारा उपक्रम म्हणून पुढे येत आहे.

# बसमधील 'लेडी चोरटी' गजाआड; ३.२० लाखांची सोन्याची पोत जप्त

## भुसावळ पोलिसांची धडक कारवाई

जन सम्राट टाईम्स

**जळगाव** | जिल्ह्यात एसटी बसमधील गर्दीचा फायदा घेत प्रवाशांचे दागिने व रोकड चोरणाऱ्या टोळ्यांविरोधात भुसावळ बाजारपेठ पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत एका सराईत महिला चोरटीला अटक करण्यात आली असून तिच्याकडून सुमारे ३ लाख २० हजार रुपये किमतीची सोन्याची पोत जप्त करण्यात आली आहे. या अटकेमुळे बसस्थानक परिसरात सक्रिय असलेल्या चोरीच्या मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**गर्दीचा फायदा घेत चोरी**

मुक्ताईनगर येथील कुसुम देविदास चौधरी (वय ६२) या २३ एप्रिल रोजी सकाळी भुसावळ बसस्थानकावरून चोपडा येथे जाणाऱ्या बसमध्ये चढत होत्या. त्यावेळी झालेल्या गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या पर्समधील २२ ग्रॅम वजनाची सोन्याची पोत लंपास केली होती. या घटनेनंतर बाजारपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

# बदलापुरात 'प्रबोधन कट्टा'चा जागर; अंधश्रद्धा निर्मूलनाचा प्रभावी संदेश

## वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यासाठी जनजागृती कार्यक्रम; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

जन सम्राट टाईम्स

**बदलापूर** | समाजातील अंधश्रद्धा, कुप्रथा आणि अनिष्ट परंपरांविरोधात जनजागृती करण्यासाठी बदलापुरात 'प्रबोधन कट्टा'च्या वतीने आयोजित विशेष कार्यक्रम उत्साहात पार पडला. 'अंधश्रद्धा निर्मूलन आजच्या काळाची गरज' या महत्त्वपूर्ण विषयावर आयोजित या कार्यक्रमातून वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रभावी संदेश देण्यात आला.

शनिवार, २५ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६:३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान स्मारक येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या ऐतिहासिक स्थळी झालेल्या उपक्रमाला स्थानिक नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभला.

**मान्यवरांचे मार्गदर्शन**

कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून डॉ. श्याम जाधव, प्रदीप बर्जे, किरण जाधव आणि वंदनाताई शिंदे उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणातून अंधश्रद्धेचे दुष्परिणाम स्पष्ट करत समाजात वैज्ञानिक विचारसरणी रुजवण्याची गरज अधोरेखित केली.

यावेळी प्रबोधनात्मक गाणी आणि शाहिरी सादरीकरणांच्या माध्यमातून उपस्थितांना प्रभावीपणे संदेश देण्यात आला. अशोक गजरमल यांनीही आपल्या खास शैलीत गाण्यांद्वारे प्रबोधन केले.

**वैज्ञानिक विचारांची गरज अधोरेखित**

कार्यक्रमात वक्त्यांनी स्पष्ट केले की, आजच्या आधुनिक युगात विज्ञान आणि तर्कशुद्ध विचारांची कास धरणे अत्यंत आवश्यक आहे. अंधश्रद्धेमुळे समाजाची प्रगती खुंटते, त्यामुळे प्रत्येकाने विवेकबुद्धीने विचार करून योग्य निर्णय घेणे गरजेचे आहे.

**उपस्थिती आणि सहभाग**

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान राजाराम खरात यांनी भूषवले, तर सूत्रसंचालन भाऊ शिर्के यांनी केले. प्रेसेनजीत सोनावणे यांनी आभार प्रदर्शन केले. तसेच या कार्यक्रमात प्रा. योगेश साळवे, मिलिंद सकपाळ, महेंद्र पिंपळसकर आदींनीही मनोगत व्यक्त करत विषयाचे गांभीर्य अधोरेखित केले.

कार्यक्रमाच्या शेवटी सुभाष रणपिसे आणि वामनराव पठारे यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

**समाजासाठी प्रेरणादायी उपक्रम**

या प्रबोधनात्मक उपक्रमातून अंधश्रद्धा निर्मूलनासाठी समाजाने एकत्र येण्याचा संदेश देण्यात आला. "चला, प्रबोधनाची चळवळ गतीमान करू या!" हा मुख्य संदेश उपस्थितांच्या मनात खोलवर रुजला. बदलापुरातील या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण झाली असून, समाज अधिक प्रगत आणि वैज्ञानिक विचारसरणीकडे वाटचाल करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.


# "सुख-दुःखात धावून येणारा युवानेता... जनतेच्या मनात घर केलेलं नाव !" - प्रतापभाऊ !"



"नेतृत्व म्हणजे केवळ पद, सत्ता किंवा अधिकार नसतो; नेतृत्व म्हणजे माणसांच्या मनात निर्माण होणारा विश्वास, जिव्हाळा आणि आपलेपणा असतो. जळगाव जिल्ह्यात नव्हे तर राज्यात हा विश्वास जर कुणी जपला असेल, तर ते म्हणजे जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी .त्यांच्या प्रमाणे जळगाव ग्रामीण मतदारसंघात असाच विश्वास संपादन केला आहे प्रतापराव पाटील यांनी त्यांनी कधीही स्वतःला पदापुरते मर्यादित ठेवले नाही, तर प्रत्येकाशी माणुसकीच्या नात्याने जोडले.



"युवानेता वही होता है, जो दिलों पर राज करता है," ही ओळ त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला साजेशी वाटते. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे सुपुत्र असले तरी त्यांची खरी ओळख म्हणजे कार्यकर्त्यांचा मित्र आणि जनतेचा आपला माणूस हीच आहे. प्रत्येकाच्या सुख-दुःखात सहभागी होणारे, प्रत्येकाच्या आयुष्यात आपलेपणाने उभे राहणारे नेतृत्व म्हणून त्यांनी आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वात भावनिक पैलू म्हणजे त्यांचे वारकरी संस्कार. दरवर्षी हजारो भाविकांना पंढरपूरला विठ्ठल दर्शनासाठी नेण्याची जबाबदारी ते स्वतः सांभाळतात. या यात्रेत ते एक वारकरी म्हणून सहभागी होतात. टाळ-मृदंगाच्या गजरात चालणे, अभंग म्हणणे, भाविकांना स्वतः जेवण वाढणे आणि त्यांची काळजी घेणे या सर्व गोष्टी त्यांच्या सेवाभावाचे जिवंत उदाहरण आहेत. संत तुकाराम महाराजांचे "सेवा हीच खरी भक्ति आहे" हे वचन त्यांच्या कृतीतून प्रत्यक्ष दिसून येते.

संस्कृती आणि परंपरेशी त्यांचे नाते अत्यंत घट्ट आहे. मतदारसंघातील प्रत्येक कीर्तन, सप्ताह आणि भजनी मंडळांमध्ये त्यांची उपस्थिती असते. कीर्तनकारांच्या संमेलनांचे आयोजन, भजनी साहित्याचे वितरण यामधून त्यांनी सांस्कृतिक वारसा जपण्याचे काम केले आहे. "ज्याची मुळे मजबूत असतात, त्याचे झाड उंच वाढते," हा विचार त्यांनी आपल्या कार्यातून जिवंत ठेवला आहे.

त्यांचा स्वभाव स्पष्ट, प्रामाणिक आणि मनमोकळा आहे. ते खोटे बोलत नाहीत; जे वाटते ते थेट सांगतात. कधीकधी त्यांच्या स्पष्टवक्तेपणामुळे काहींना राग येतो, परंतु नंतर त्याच लोकांना त्यांच्या बोलण्यामागची खरी भावना जाणवते. अटल बिहारी वाजपेयी यांनी म्हटले आहे, "सत्ता ही सेवा करण्याचे माध्यम असावे," आणि हीच भावना त्यांच्या वागण्यात दिसून येते.

"प्रतापराव पाटील यांची मैत्री ही केवळ ओळख किंवा राजकीय संबंधांपुरती

धनराज गोपाल कासट
व्यावसायिक व अध्यक्ष, माहेश्वरी समाज धरणगांव तालुका, पाळधी

मर्यादित नाही, तर ती मनाने जोडलेली एक जिव्हाळ्याची नाळ आहे. 'GPS परिवार', 'विकी बाबा मित्रपरिवार' किंवा त्यांच्या वैयक्तिक मित्रमंडळींमध्ये त्यांनी जपलेले नाते हे पद, प्रतिष्ठा किंवा परिस्थितीवर अवलंबून नसून विश्वास, साथ आणि आपलेपणावर उभे आहे. सुखात - यशात नव्हे तर अडचणीच्या काळात खांद्याला खांदा लावून उभे राहणारा मित्र म्हणून त्यांची ओळख अधिक घट्ट झाली आहे. 'मैत्री म्हणजे केवळ एकत्र वेळ घालवणे नाही, तर एकमेकांसाठी कायम उभे राहणे' - हा विचार त्यांनी आपल्या मित्रपरिवारासोबतच्या नात्यातून जिवंत ठेवला आहे." त्यांचा जीवनप्रवासही प्रेरणादायी आहे. साध्या परिस्थितीत सायकलवरून डी.एड. नंतर पदवी शिक्षण पूर्ण करणारा हा युवक आज हजारो लोकांच्या आयुष्यात आशेचा किरण बनून उभा आहे. "छोटे कदम से शुरू हुआ सफर, आज हजारों के जीवन का सहारा बन गया," ही ओळ त्यांच्या प्रवासाचे अचूक वर्णन करते.

आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त एक गोष्ट ठळकपणे जाणवते — प्रतापराव पाटील म्हणजे लोकांच्या मनात घर करणारे, आपुलकी जपणारे आणि प्रत्येकाच्या आयुष्यात विश्वास निर्माण करणारे व्यक्तिमत्त्व आहे. त्यांनी जपलेले माणुसकीचे नाते हेच त्यांच्या नेतृत्वाचे खरे बळ आहे. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त करताना एकच भावना व्यक्त होते — त्यांनी असेच लोकांच्या मनात स्थान मिळवत राहावे आणि समाजात आपलेपणाचा प्रकाश पसरवत राहावे.